# सद्गुरु बापट गुरुजी यांचे 'यज्ञरहस्य"

जीव सृष्टीच्या संवर्धनामध्ये अग्नीचे आणि प्रकाशाचे असणारे अनन्यसाधारण महत्त्व आदिम काळातल्या मनुष्याला जसजसे उलगडत गेले तसतसे त्याच्या हे सुद्धा लक्षात आले की आधिदैवत आणि आध्यात्मिक दृष्टीनेही अग्नीचे महत्त्व तितकेच मोठे आहे या जाणिवेतूनच समाजाला एकत्र आणणाऱ्या यज्ञसंस्थेचा उगम वैदिक काळात झाला. वैदिक काळात निर्माण झालेली ही अग्नी साधना पुढे हिंदू धर्मात जशी रुढावली तशीच ती झोरस्ट्रीयन, यहुदी या प्राचीन धर्मांमध्येही रुजली आणि स्थिरावली. धूप, मेणबत्ती, पणती, निरांजन, कापूरज्योती या आणि यासारख्या अनेक माध्यमातून अग्नीची उपस्थिती जवळ जवळ सगळ्या धार्मिक स्थानांवर आजही आढळून येते. अग्नी उपासनेचे मूळ उत्तम स्थान असणाऱ्या भारतातून मात्र यज्ञ संस्था बहुतांशी नामशेष झाली आहे. अर्थात यामागे अनेक धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि व्यावहारिक कारणे आहेत, ज्यांचा सखोल मागोवा इतिहास तज्ञांनी घेतला आहे. आजही काही तुरळक ठिकाणी, कोणत्यातरी निमित्ताने यज्ञ-याग केले जातात. परंतु त्यातही काही ठराविक लोकच क्रियाशील सहभाग घेतात. तर उरलेले लोक फक्त प्रेक्षकाची भूमिका घेताना दिसतात. अक्कलकोटचे सद्गुरू श्री गजानन महाराजांच्या कार्यामुळे यज्ञ साधनेला वैयक्तिक साधनेचे रूप देऊन निर्माण झालेली अग्निहोत्र साधना समाजातल्या अनेक स्तरांपर्यंत पोहोचली हे खरे. परंतु मूळ यज्ञ साधनेला अपेक्षित असणारे सामाजिक संघटन, एकाग्रता आणि एकत्रित शक्ती निर्मिती हे यज्ञ संस्थेचे अविभाज्य पैलू आज विस्मरणात गेले आहेत. किंबहुना आजच्या पिढीत, 'यज्ञ म्हणजे एक कर्मकांडाचा उपचार" असा समज रुढावताना दिसतो. यज्ञ साधनेवर उपलब्ध असणारे मराठी भाषेतले साहित्यही त्या दृष्टीने त्रोटक आणि एकांगी आहे, कारण त्यात यज्ञ साधनेतल्या केवळ कृतींचाच उहापोह केलेला आढळतो. भगवद्गीतेत मांडलेल्या यज्ञ विचारावर बऱ्याच लेखकांनी भाष्य केले आहे, परंतु या मध्येही यज्ञाच्या व्यापक अशा तात्विक रूपावरच अधिक भर दिला जातो. त्या 'महतो महियान" यज्ञापर्यंत पोहोचण्यासाठी पूर्व-मीमांसेमध्ये उल्लेख केलेली यज्ञसाधना आजच्या काळातल्या सामान्य साधकाने अवलंबायची ठरवली तरी ती गोष्ट अशक्यप्राय आहे. याचे कारण त्याला निश्चित मार्गदर्शन करणारा, त्याच्या सर्वसामान्य शंकांना उत्तरे देणारा एकही ग्रंथ आज उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर यज्ञेश्वर प्रकाशनाने प्रकाशित केलेले, सद्गुरू बापट गुरुजी यांचे 'यज्ञरहस्य" हे पुस्तक महत्त्वाचे ठरते.

पुस्तकाचे नाव : यज्ञ रहस्य

लेखक : परमपूज्य सद्गुरू श्री वासुदेव वामन बापट

प्रकाशक : यज्ञेश्वर प्रकाशन, कल्याण

एकूण पृष्ठ संख्या : ८८

देणगी मूल्य : रु. १५०/-

पुस्तकाच्या सुरवातीलाच छापलेल्या मनोगतात श्री गुरुजी म्हणतात,'विश्वाचे संचलन करणाऱ्या प्रकाश शक्तीचे साकार रूप म्हणजे अग्नी. हाच अग्नी जेव्हा उन्नतीच्या सद्हेतूने व मंत्रशक्तीच्या सहचर्याने प्रज्वलित केला जातो, तेव्हा तोच 'यज्ञ" होतो... सर्व साधक-वाचक वर्गाला यज्ञ साधनेची माहिती होऊन तिचे ज्ञानपूर्वक आचरण समाजातल्या प्रत्येक घटकाने करावे!" ज्ञानदानाच्या याच तळमळीने आपले विचार श्री बापट गुरुजींनी पुस्तकात मांडलेले आहेत. एकूण पाच प्रकरणांमध्ये विभागल्या गेलेल्या या अठ्ठ्याऐंशी पानी सचित्र पुस्तकात सुरुवातीला यज्ञाची व्याख्या आणि संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यात 'सन्मान संगतीकरण आणि दान" या यज्ञाच्या त्रिसूत्रीवरील श्री बापट गुरुजींचे विवरण वाचताना एक विचार सहज मनात येतो तो म्हणजे 'त्यागा आणि मग भोगा" या यज्ञ संस्थेच्या पायाभूत संकल्पनेमुळेच भारतात आजवर निव्वळ भोगवादी दृष्टिकोन बळावला नाही. 'इदं न

मम" अर्थात 'हे माझे नाही," असे म्हणत वैयक्तिक आणि सामाजिक सुखप्राप्तीसाठी यज्ञामध्ये वेळ, श्रम, धन आणि आहुती अर्पण करणाऱ्या याज्ञिकाची मनोभूमिका कालांतराने 'समाजासाठी देहाचा यज्ञ" करण्याच्या उदात्त मनोभूमिकेपर्यंत उन्नत होते. हाच विचार गुरुजींनी ठायी ठायी स्पष्ट केला आहे. भगवद्गीतेचा आधार घेऊन लोकमान्य टिळक, संत विनोबा, महात्मा गांधी यासारख्या अनेक समाज धुरीणांनी यज्ञाची व्याख्या स्पष्ट केली आहे. यालाच कोणी कर्मयज्ञ कोणी ज्ञानयज्ञ, सेवायज्ञ किंवा दानयज्ञ अशी विविध नावेही दिली आहेत. या संकल्पनांना कुठेही छेद न देता, किंबहुना त्यांचे समर्थन करत असतानाच श्रीगुरुजी पूर्वमीमांसा पुरस्कृत वैदिक यज्ञाचाही आग्रही पुरस्कार करतात आणि त्याचे कारणांसह, सोदाहरण स्पष्टीकरण देतात. वैदिक यज्ञातले मूळ सिद्धांत जपत असताना, कालानुरूप त्यात कोणकोणते बदल करणे अपेक्षित आहे याचाही उहापोह श्रीगुरुजी करतात.

भारतीय अध्यात्माची विज्ञानाशी घातलेली सांगड हा या पुस्तकाचा अजून एक महत्त्वपूर्ण कंगोरा आहे. आधुनिक विज्ञानाच्या संस्कारात वाढलेल्या मनुष्याला आध्यात्मिक संकल्पना समजाव्यात यासाठी विज्ञानाच्या परिभाषेत त्या समजावून सांगण्याचा श्री बापट गुरुजींचा प्रयत्न स्तुत्य आहे. यज्ञातली शक्ती निर्मितीची प्रक्रिया, हवनाचे वैज्ञानिक रहस्य, मेंदुशास्त्रानुसार एकाग्रता म्हणजे काय आणि ती यज्ञाद्वारे कशी साधता येते, प्रकाश आणि ध्वनी माध्यमाचे एकत्रित फायदे यासारख्या संकल्पना त्यांनी विज्ञानाचा आधार घेऊन स्पष्ट केल्या आहेत. यासाठी जडभौतिक शास्त्र, क्वांटम विज्ञान, मेंदुशास्त्र, मनोविज्ञान, आधुनिक वैद्यकशास्त्र या विज्ञानातल्या अनेक शास्त्रांमधले संदर्भ आणि सिद्धांतांचा आधार घेतला आहे. 'यज्ञसाधना आणि मंत्रविज्ञान" हे प्रकरण तर विशेष उल्लेख करण्यासारखे आहे कारण त्यात मंत्रसाधनेचे आणि यज्ञसाधनेचे एकत्रित विश्लेषण केले आहे. मानवी उत्क्रांती आणि भाषा माध्यमाचा विकास, शब्दांचे मानवी देह-मनावर होणारे परिणाम याचा आढावा घेत, श्रीगुरुजी मंत्रांच्या उत्पत्तीचे, परिणामकारकतेचे सुरेख वर्णन करतात. मंत्र म्हणजे निरर्थक शब्दांची निर्हेतुक बडबड नाही तर शक्ती निर्मितीचे ते एक प्रचंड परिणामकारक साधन आहे याचा उलगडा वाचकाला झाल्यावाचून राहत नाही. सारांशाने 'प्रकाशाशी मैत्री करून त्यावर मंत्रपठणासह एकाग्रता केल्याने" स्वत:ची प्रगती कशी साधता येईल याची सुस्पष्ट कल्पना वाचकाला मिळते. शेवटच्या प्रकरणात यज्ञाचा संकल्प करणाऱ्या साधकाने कोणकोणती पथ्ये पाळावीत जेणे करून भौतिक उन्नतीबरोबरच आध्यात्मिक उन्नतीच्या चरम सीमेपर्यंत त्याला पोहोचता येईल याचेही मार्गदर्शन श्री गुरुजींनी केले आहे.

अर्थात नुसते पुस्तकी ज्ञान किंवा विज्ञानातले संदर्भ देऊन उपयोग नाही तर ते ज्ञान कृतीत उतरवून त्याचा स्वयं-अनुभव साधकाने घेतला पाहिजे. मुळात अध्यात्म हा प्रांतच अनुभवगम्य असल्याचे स्वत: बापट गुरुजीही मान्य करतात (पृ.क्र.७२) आणि नेमके इथेच सद्यस्थितीत उपलब्ध असणाऱ्या वैज्ञानिक संदर्भांचा तोकडेपणाही वाचकांच्या लक्षात आणून देतात. अध्यात्म आणि विज्ञान हे दोन्ही प्रांत एकमेकांपासून पूर्णत: भिन्न आहेत ही मानसिकता आपण पाश्चात्य देशांमधून आयात केली आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये अशी फारकत कधीही केली गेली नाही आणि त्यामुळेच प्राचीन तत्त्ववेत्ते हे संशोधकही होते आणि अध्यात्म्यातले द्रष्टेही होते. विचारांचा धागा पकडून श्री गुरुजींनी 'यज्ञ" हा विषय लोकांपुढे मांडला आहे. या पुस्तकामागे असलेले श्री गुरुजींचे चिंतन हे त्यांच्या अनेक वर्षांच्या कार्यावर आधारित आहे. श्री बापट गुरुजी, विज्ञानधिष्ठित पायावर यज्ञ संस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचे स्तुत्य सेवा कार्य गेली सतराहून अधिक वर्षे करत आहेत. त्यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या प्रकाश ज्ञान शक्ती केंद्र या संस्थेने भारतातल्या विविध ठिकाणी आजवर २५६हून अधिक यज्ञ आयोजित केले आहेत. केंद्राच्या यज्ञ कार्यक्रमांमध्ये जात, धर्म, लिंग अथवा इतर कोणताही भेद न बाळगता, सर्व उपस्थित साधकांना सहभागी होण्याची संधी दिली जाते. अनेक वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवानंतर आधारित असल्याने हे पुस्तक केवळ सैद्धांतिक (theoretical) ज्ञान देत नाही तर ते ज्ञान कृतीत उतरवण्याचे मार्गदर्शनही करते. पुस्तकाच्या शेवटी वाचकाच्या बुद्धीला चालना देण्यासाठी विस्तृत संदर्भ सूची आहे. एखादा मुद्दा समजावण्यासाठी आकृत्या दिल्या आहेत. या सगळ्यांमुळे या आध्यात्मिक पुस्तकाला एखाद्या वैज्ञानिक शोध निबंधाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

श्री बापट गुरुजींचे नाव मराठी वाचकाला प्रथम माहित झाले ते त्यांच्या '(अ)घोरकष्टोद्धरण" आणि 'श्रीगुरुस्तुति" या पुस्तकांमुळे. त्यांची 'रविवार सामना"मधली आध्यात्मिक लेखांची मालिकाही बरीच गाजली. या भक्तिप्रचुर साहित्याच्या पार्श्वभूमीवर 'यज्ञरहस्य" हे पुस्तक त्यातल्या विज्ञानधिष्ठित पृथक्करणाच्या प्राबल्याने थोडे वेगळे ठरेल. कर्मठ मतांना चिकटून राहिलेल्या वाचकाला, नास्तिकमताच्या बुद्धिवादी वाचकाला किंवा देवळात घाईघाईने नमस्कार करून नोकरीचे ठिकाण गाठणाऱ्या सामान्य चाकरमानी मनुष्याला, यापैकी कोणालाही हे पुस्तक वाचून क्षणभर आत्मशोधन करावेसे वाटेल हे मात्र निश्चित आहे.